मूल्य १० रुपये

न मातुः पर दैवतम् ।

। जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।

# मातृसेवा



**नवीन वर्षाच्या शुभेच्छा!!!!**

**वर्ष ५७ वे** **२४ मार्च २०२३** **अंक ३**



# मातृसेवा

कै. कमलाताई होस्पेट : संघसंस्थापिका
कै. प्रमिला दाणी : आद्य संपादिका


**स्थायी समिती (२०२१-२०२८)**

- डॉ. अरुणा बाभुळकर : अध्यक्ष
- डॉ. लता देशमुख : सचिव
- श्रीमती शीला राव : संपादिका
- श्रीमती ममता चिंचवडकर
- श्रीमती सुरेखा देवघरे
- सौ. यश:श्री वाघ
- श्रीमती शोभा पारळकर
- श्रीमती वनिता पाटील : आमंत्रक


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | – शीला राव | ३ |
| अध्यक्ष – मातृ-सेवा-संघ : डॉ. अरुणा बाभुळकर | – शीला राव | ४ |
| सचिव – मातृ-सेवा-संघ : डॉ. लता देशमुख | – यश:श्री वाघ | ५ |
| वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी : डॉ. रत्ना शेखावत | – यश:श्री वाघ | ६ |
| विदुषी डॉ. चित्रा मोडक | | ८ |
| शाला प्रशासक – लता थेरगांवकर | | ९ |
| डॉ. स्वाती हिरुरकर-धर्माधिकारी | | ११ |
| डॉ. भारती जयंत सुदामे | | १२ |
| आरोहच्या – विशाखा राव | – शोभा पारळकर | १३ |
| दिव्य दृष्टी – जिज्ञासा | – शोभा पारळकर | १४ |
| असामान्य प्रतिभेच्या दुर्गा पारखी | | १५ |
| सूरश्री कल्याणी देशमुख | – शुभांगी विठाळकर | १६ |
| माझी ओळख..... ऋतुराज | | १८ |
| प्राजक्ता उपाध्याय | | २० |
| नागपुराला 'अलग अँगल' देणाऱ्या : मिली विकमसी | | २१ |
| संदेह.... संघर्ष ..... मुक्तता... | – डॉ. निर्मला वझे | २२ |
| प्राजक्ता उपाध्याय | | |
| **Twinkle Star Editor - Aasawari Shenolikar** | | २३ |
| **शाखावृत्त** | | |
| मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे 'कॅन्सर जनजागृती कार्यक्रम' | | २४ |
| शाखा आर्वी – 'कॅन्सर जनजागृती कार्यक्रम' | | २६ |


कृपया नोंद घ्यावी, वार्षिक वर्गणी रु. २०० आहे लवकरात लवकर वर्गणी पाठवावी.


कार्यालय : मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर – १० फोन : २५२२३९३, २५२२२८७, २५२३५९६
Website : http:/www.mss.org.in Email : matrusewa@yahoo.com


अंक मिळत नसल्यास जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये तक्रार करावी.

# संपादकीय

**– शीला राव**

**पुण्यकर्म, देवता, भाग्यही । निष्फळ ठरती कधीमधी ।**
**उद्योगाला ठाऊक नसतो । 'निष्फळता' हा शब्द कधी ।।**

वरील उक्ति सार्थ करून दाखविणारे लोक या विश्वात खात्रीनेच आहेत. ते त्यांच्या अविरत उद्योगाने, कामाने समाजाला मोलाची मदत करीत असतात. असे फक्त पुरुषच असतात असे नाही, बऱ्याच महिलाही अशा सापडतील, ज्या एका ध्येयाने प्रेरित होऊन असे काम करीत असतात. जागतिक महिला दिवसाच्या निमित्ताने आपण अशाच काही, वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या, महिलांची ओळख करून घेत आहोत आपल्या ह्या अंकात !

भारताच्या मध्यबिंदु असलेले नागपूर आता अनेक कारणांनी महत्त्वाचे आणि अग्रेसर शहर म्हणून आपले अस्तित्व जाणवून देत आहे. इथले साहित्यिक, कवी, गायक, नाटककार महाराष्ट्रातच नाही तर भारतातही लौकिक मिळवलेले आपण बघतो. कमलाताई होस्पेट, अनसूयाबाई काळे हल्लीच्या आशा बगे, लीना रस्तोगी ह्यांना कोण ओळखत नाही?

सध्या विविध क्षेत्रांमध्ये काम करीत असलेल्या आणि काही प्रसिद्धी प्राप्त केलेल्या तसेच नवीन प्रसिद्धीला येणाऱ्या स्त्रियांचा परिचय करून देण्याचा प्रयास केलेला आहे अंकात! अर्थात् याशिवायही इतर बऱ्याच महिला आहेत नागपुरात ज्या मोलाचे काम करीत आहेत, त्यांच्याविषयी नंतर सांगावे लागेल.

मातृ सेवा संघ ही खूपच जुनी संस्था आहे. तिच्या अनेक शाखा, प्रवृत्ती, प्रकल्प बरेच आहेत, तिथे अनेक वर्षापासून कार्यभार सांभाळत असलेल्या वर्तमान महिलांचा परिचय सगळ्यांना नाही, त्यांचा थोडक्यात परिचय देण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या माहितीसाठी सांगते – तिथे पदाधिकारी नेहमीच महिला असतात.

संगीत, चित्रकला, मनोरंजन, मानसोपचार, साहित्य, समाजसेवा इत्यादि क्षेत्रात नागपूरच्या स्त्रिया काय करीत आहेत याची थोडी कल्पना दिली आहे. आणखीही बरेच काही केले जात आहे, कितीतरी मोलाचे काम स्त्रियांकडून नागपुरात होत आहे. त्या सर्वांना प्रेमपूर्वक, सविनय प्रणाम !

**तिथेच रमती देव–देवता, स्त्रीला आदर जिथे मिळे ।**
**जिथे न आदर तिला जराही, तिथे कार्य कुठले न फळे ।।**

---

# अध्यक्ष – मातृ–सेवा–संघ : डॉ. अरुणा बाभुळकर

**– शीला राव**

अरुणाताई हे एक बहु–आयामी, बहुगुणी व्यक्तिमत्त्व आहे. त्या नागपुरातील अत्यंत महत्त्वाच्या व्यक्ति आहेत. त्यांचा थोडक्यात परिचय करून देण्याचा माझा प्रयत्न आहे.

मुंबईत जन्मलेल्या अरुणाताईंचा विवाह नागपुरातील अस्थिशल्यविशारद डॉ. सुधीर बाभुळकारांशी झाला आणि त्यांनी नागपूरला पूर्णपणे आपलेसे करून घेतले आणि अनेक क्षेत्रांमध्ये मोलाची कामगिरी केली आहे. सध्या त्या नागपुरातील १०१ वर्षे पूर्ण झालेल्या मातृ सेवा संघामध्ये अध्यक्षाचे पद कुशलतेने सांभाळत आणि भूषवितही आहेत. त्या उत्तम प्रशासक असल्याचा पुरावा बघा –

सुश्रुत हॉस्पिटलचे व्यवस्थापन ५० वर्षे त्यांनी केले. १०वर्षे सलग भगिनी मंडळाच्या अध्यक्ष म्हणून काम केले. तिथे अनेक नवीन स्पर्धा, प्रदर्शने, शिबिरे भरवून संस्थेला स्वयंपूर्ण बनविले. त्या नागपूरच्या सुधारणा ट्रस्टच्या अध्यक्ष होत्या.

स्वतःच्या वाचनाच्या आवडीमुळे त्यांनी धामण्याला सिमरन सार्वजनिक वाचनालय स्थापन केले. १९८७ मधे विदर्भ रोझ सोसायटीच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेऊन ६ वर्षे त्याचे अध्यक्षपद सांभाळले. आंतरदेशीय गुलाब–प्रदर्शनाची आखणी केली. शेतकऱ्यांच्या फुलांच्या सुरक्षिततेसाठी शीतगृहे, तसेच विक्रीसाठी सोय करण्याचे जिवापाड प्रयत्न केले. अमरावती रोडला सिद्धि–सेवा–रुग्णालय, जे विनामूल्य उपचार व चिकित्सा करते ते सुरू केले.

ह्याशिवाय अनेक संस्थांच्या त्या अध्यक्ष, सचिव आहेत आणि मार्गदर्शकही आहेत. कमलाबाई होस्पेट स्त्री–सहाय्यक–मंडळाच्या सचिव आणि उपाध्यक्षही राहून त्यांनी मोलाचा हातभार लावलेला आहे. मातृ–सेवा–संघाच्या विद्यमान अध्यक्षा म्हणून त्या १०–१२ वर्ष तरी मोलाची कामगिरी करीत आहेत. 'रानाई' नावाची संस्था स्वतःचा व्यवसाय म्हणून सुरू केली. जी गार्डन ले–आउट करते.

त्यांना अनेक छंद आहेत. काही आपण पाहिले आहेतच, पण आणखी एक महत्त्वाचा म्हणजे देश–पर्यटन! त्यांनी जवळजवळ ५० देशांना भेटी दिलेल्या आहेत. त्यांतील काही देशांची नावेही आपल्याला माहित नसतील. दक्षिण आणि उत्तर ध्रुवालाही त्या जाऊन आल्या आहेत आणि इतकेच नव्हे तर त्यांच्या ह्या सफरीविषयी माहिती देणारी पुस्तकें, छायाचित्रांसहित, प्रसिद्ध केली आहेत. त्यातीत काही – 'सफर अंटार्टिकाची–कष्टप्रद तरीही स्वर्गीय आनंद देणारी', 'भूतान–न भूतो न भविष्यति'.

ह्या आणि अनेक उपलब्धी आहेत त्यांच्या गाठी. पण मुख्यतः सांगायचे म्हणजे त्या अत्यंत सहृदय, साध्या आणि नेहमी दुसऱ्यांना मदत करणाऱ्या आहेत. नेहमी हिशेबात चोख! त्या दुसऱ्यांचा कुठलाही प्रॉब्लेम पैशाचा, आरोग्यविषयक आत्मीयतेने सोडवतात. लोकांना आपलेसे करण्याचे त्यांचे कसब वाखाणण्यासारखे आहे. त्यांच्याठिकाणी असलेल्या, प्रेम, माया, आत्मीयता, हिंमत, लोकांना प्रोत्साहन आणि धीर देण्याच्या गुणांमुळेच त्या काम करीत असलेल्या संस्थांची प्रतिष्ठा समाजात उंचावली आहे !

---

## सचिव – मातृ–सेवा–संघ : डॉ. लता देशमुख

**– यश:श्री वाघ**

मातृ–सेवा–संघ ह्या संस्थेला शंभर वर्षे पूर्ण होऊन तिची शतकोत्तर वाटचाल सुरू झालेली आहे. आजमितीस सूतिकागृहाच्या महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर असलेल्या शाखेव्यतिरीक्त उपेक्षित, अनाथ, दिव्यांग तसेच वृद्धांसाठी उभारलेले अनेक प्रकल्प मातृ सेवा संघात यशस्वीपणे राबवीत आहे ही आनंदाची, गौरवाची बाब आहे. विशेष म्हणजे या कार्याला पुढे अव्याहत सुरू ठेवण्याचं काम महिला सदस्य असलेलं व्यवस्थापन करीत आहे. या व्यवस्थापनाचं कणखरपणे नेतृत्व करणाऱ्याा कुशल सचिव आहेत डॉ. लता देशमुख!

डॉ. लताताई ह्या मूळच्या अमरावतीच्या. त्यांच्या वडीलांची नोकरी मध्यप्रदेशमध्ये असल्यामुळे त्यांचे बीएस्सी. व एम.एस्सी पर्यंतचे शिक्षण जबलपूर, मध्यप्रदेश व इतर ठिकाणी झाले. पुढील शिक्षणासाठी त्या नागपूरला आल्या. त्यांनी बीएड् व पीएच्.डी. नागपूर येथून केले व त्या नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य करू लागल्या. या काळात त्यांनी अध्यापन व संशोधन विषयक अनेक परिसंवाद, कार्यशाळा, परिषदांना उपस्थिती दर्शविली. त्यांचे रसायनशास्त्र विषयावर विविध राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांनी 'व्हिएन्ना' येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये रसायनशास्त्र विषयावर पेपर सादर केला.

हिस्लॉप कॉलेज मध्ये सन १९७६ पासून त्यांनी १५ वर्षे कनिष्ठ, २१ वर्षे पदवीधर व १२ वर्षे पदव्युत्तर पाठ्यक्रमाच्या विद्यार्थ्यांना जवळजवळ ३६ वर्ष अध्यापनाचे कार्य केले. त्यांनी डीन आणि कॉलेजच्या उपप्राचार्य अशा विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या आहेत.

हिस्लॉप कॉलेजमधून सन २०१२ मर्ध्य उपप्राचार्य म्हणून निवृत्त झाल्यानंतरही त्या पदव्युत्तर विभागाच्या तसेच डॉ.इरा निमदेवकर संशोधन प्रयोगशाळेच्या संचालक

म्हणून सन २००९ पासून आजपर्यंत कार्यभार सांभाळत आहेत. त्या मातृसेवासंघाच्या आजीव सदस्या, बरोबरच रेल्वे स्टेशन सल्लागार समिती नागपूर स्टेशन, भारतीय महिला वैज्ञानिक संघ, इंडियन केमिकल सोसायटी आणि उच्च न्यायालय विधी सेवा उपसमिती नागपूर खंडपीठ नागपूर इ. मध्ये सदस्य आहेत. १९९१ साली त्या मातृ सेवा संघाच्या सभासद झाल्या आणि सन १९९६ मध्ये झालेल्या निवडणूकीनंतर संस्थेच्या सचिव. सचिवपदाचीही महत्त्वाची जबाबदारी त्या खंबीरपणे पेलतात.

त्यांच्या कार्यकाळात बदलत्या परिस्थितीनुसार व मूलभूत गरजा लक्षात घेऊन प्रकल्प व प्रवृत्त्यांमध्ये आवश्यक ते बदल व नूतनीकरण केले. संस्थेच्या शतकपूर्ती पर्यंत बहुतेक शाखा, प्रकल्प व प्रवृत्ती ह्यांनी रजत, सुवर्ण जयंती आणि हीरक महोत्सव साजरे केले आहेत. संस्थेचा शतकपूर्ती सोहळा डॉ. देशमुख ह्यांच्या सचिव पदाच्या कार्यकाळात संपन्न झालेत हे उल्लेखनीय आहे. विशेष म्हणजे सन २०१४ मध्ये पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या नावाच्या पोस्टाच्या तिकिटाचे अनावरण आणि सन २०१६ मध्ये भोले पेट्रोलपंप चौक ते अलंकारसिनेमा-चौक या मार्गाला 'पद्मश्री कमलताई होस्पेट मार्ग' हे नामकरण व शताद्बिपूर्ती सोहळ्यात 'मातृसेवासंघाचा संक्षिप्त इतिहास' या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले ही अभिमानास्पद बाब आहे.

कै. कमलाताईंनी ज्या जिद्दीने व कष्टाने संस्था उभी केली, वाढवली त्याच जिद्दीने व प्रचंड मेहनतीने डॉ. लता देशमुख ह्यांनी पूर्ण निष्ठेने चालवून संस्था नावारूपाला आणली. त्यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य भावी पिढ्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरेल यात काही शंका नाही.

---

## वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी : डॉ. रत्ना शेखावत

**- यश:श्री वाघ**

मातृसेवासंघ या संस्थेचा उल्लेख जेव्हा होतो त्यावेळी एक आदरयुक्त आपुलकीची भावना आपोआप जनमानसामध्ये निर्माण होते. समाजातील अनेक उपेक्षित, गरीब व गरजू महिलांना मातेच्या ममतेने उपचार व आधार देण्याच्या उदात्त हेतूने पद्मश्री कमलाताई होस्पेट यांनी सन १९२१ साली सीताबर्डी सूतिकागृहाची स्थापना केली. आज शंभर वर्षांनंतरही तितक्याच तळमळीने हे कार्य अव्याहतपणे सुरू आहे. याचे श्रेय केवळ महिला सदस्य असलेल्या व्यवस्थापनाबरोबरच मनोभावे संस्थेला वाहून घेतलेल्या निष्ठावंत स्वयंसेविकांनाही जाते. पूर्णवेळ किंबहुना आयुष्यभर मातृ सेवा संघाची बांधिलकी मानणारी अशीच एक प्रेरणादायी व्यक्ती म्हणजे डॉ. रत्ना शेखावत.

गेल्या चार दशकांपासून डॉ. शेखावत या मातृ-सेवा-संघ व इतर समाजसेवेतील महिलांच्या आरोग्याशी संबंधित कार्य करणाऱ्या प्रत्येकासाठी शक्ती, जिद्द, दृढनिश्चय, समर्पण आणि नि:स्वार्थ सेवेचा स्रोत आहे. त्यांनी सीताबर्डी सूतिकागृहातील Obs व Gyn ची वैद्यकीय मानके वाढवली आहेत.

नागपूर मेडिकल कॉलेजमधून त्यांनी MBBS, DGO व MD (Obgy) तसेच FICMH नार्ची कोलकता येथून वैद्यकीय शिक्षण पूणे केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर एका मैत्रिणीच्या सल्ल्याने त्यांनी मातृ सेवा संघाच्या सीताबर्डी मॅटर्निटी होम येथे डॉक्टर म्हणून कार्य सुरू केले आणि नंतर स्वत:ला याच संस्थेच्या कार्यात समर्पित करून घेतले. खरं तर उच्चशिक्षित असल्यामुळे त्यांना कोणत्याही मोठ्या हॉस्पिटलमध्ये लठ्ठ पगाराची नोकरी सहज मिळू शकली असती. परंतु केवळ सेवाभावाने त्या मातृ सेवा संघातच अल्प मानधनावर कार्य करीत राहिल्या. त्या रुग्णालयात वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणून आजही जबाबदारी पार पाडीत आहेत. ह्याचा आवर्जून उल्लेख करणे आवश्यक वाटते.

रुग्णालयात कार्य करीत असताना त्यांनी अनेक प्रशिक्षणासाठी उत्तम मार्गदर्शक म्हणून आपला ठसा उमटवला आहे. Dr. C.S. Dawn NARCHI, ICMCH कोलकाता या संस्थेद्वारे केलेले डिप्लोमा कोर्सेस, DRCH, DFW आणि Dip. G.O. साठी सहकारी मार्गदर्शक तसेच PHC च्या डॉक्टरांकरिता BEmoc (बीमॉक) (Basic Emergency Obstetric Care) व सेविकांसाठी SAB (Skilled Attendent at Birth) या प्रशिक्षणाकरिता त्यांनी प्रशिक्षक म्हणून कार्य केले. तसेच CAC (Comprehensive Abortion Care) या डॉक्टरांसाठी असलेल्या प्रशिक्षणासाठी देखील त्या प्रशिक्षक आहेत.

डॉ. शेखावत या मातृ सेवा संघाबरोबरच, NOGS च्या सदस्य आहेत. IMA नागपूर, नार्ची नागपूर चॅप्टर आणि IMA नागपूर चॅप्टरच्या सदस्य आहेत.

त्यांनी १९८३ पासून अनेक लोकवस्त्यांमध्ये, झोपडपट्टी भागामध्ये ICDS या संस्थेबरोबर कुटुंबनियोजन आणि व्यापकसमुदायसेवा प्रदान करण्याचे काम केले आहे. रुग्णालये, शाळा आणि समुदायामध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांनी बुटीबोरी आणि खापरीसारख्या ग्रामीण भागात कार्य केले आहे.

डॉ. शेखावत यांना ICMCH मध्ये योगदान दिल्याबद्दल Dr. CS Dawn NARCHI ICMCH यांच्या द्वारे सिल्व्हर ट्रॉफीसह वर्ष २०१२ साठी ''स्त्रीरोग शास्त्रातील उत्कृष्ट सहकारी मार्गदर्शक'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

१९८३ सालापासून मातृ-सेवा-संघासारख्या धर्मदाय रुग्णालयात अत्यंत

प्रामाणिकपणे सेवा देत आहेत. सीताबर्डी मॅटर्निटी होमच्या त्या कणा आहेत आणि मातृ सेवा संघ कार्यकारिणीच्या आधारस्तंभ आहेत. त्या मातृ-सेवा-संघ अनुभव कार्यकारी समिती व मातृ सेवा संघ युवा कार्यशक्ती यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. सीताबर्डी मॅटर्निटी होम त्यांचा प्राण आहे. या रुग्णालयाच्या कार्यासाठी त्यांनी कठीण परिश्रम करून रुग्णालयाला प्रतिष्ठित आनंदीबाई जोशी पुरस्कार प्राप्त करवून दिला.

स्वत:ला सेवाकार्यात वाहून घेतलेल्या डॉ. रत्ना शेखावत यांनी वैद्यकीय क्षेत्रात एक कठोर शिस्तप्रिय, निष्णात डॉक्टर, परिपूर्णतावादी आणि निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून नावलौकिक मिळवला आहे.

---

## विदुषी डॉ. चित्रा मोडक

डॉ.चित्रा मोडक ग्वाल्हेर घराण्याच्या आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या अ श्रेणीच्या शास्त्रीय संगीताच्या गायिका म्हणून सर्वत्र परिचित आहेत. पं. शंकरराव मराठे, पं. प्रभाकरराव देशकर आणि पं.प्रभाकरराव खर्डेनवीस या ग्वाल्हेर घराण्याच्या दिग्गज गुरूंकडून ख्याल, ठुमरी, दादरा, टप्पा, भजन आणि नाट्यसंगीत या गीत प्रकारांचे उत्तमरीत्या आणि भरभक्कम मार्गदर्शन लाभले.

श्री. लक्ष्मणराव आणि श्रीमती शीला मोडक या मातापित्यांच्या आणि गुरूंच्या आशीर्वादाने भारतातील अनेक मान्यवर आणि प्रसिद्ध संगीत संस्था, संगीत महोत्सव, संगीत उत्सवात गायन प्रस्तुत करण्याची चित्राला संधी मिळाली, जसे तानसेन संगीत महोत्सव, महाराष्ट्र मंडळ, कलकत्ता, गोवा कला अकादेमी, सुश्री केसरबाई केरकर संगीत संमेलन, पं. दीनानाथ मंगेशकर स्मृतिसंगीतसंमेलन, गोवा, कालिदास महोत्सव, डॉ. वसंतराव देशपांडे स्मृतिसंगीत संमेलन, काशी संगीत समाज, वाराणसी, उस्ताद अल्लादिया खान स्मृतिसंगीत संमेलन, बांद्रा संगीत सर्कल, स्वामी गुणीदास संगीत संमेलन, मुंबई, गांधर्व मित्र, सूर संगत, गानवर्धन, पुणे, वनिता समाज, महाराष्ट्र मंडळ, दिल्ली, अभिनव कला समाज, महाराष्ट्र मंडळ, इंदोर, राज्य शासनाचा विविध कला महोत्सव, गुण-रस-पिया-संगीत-कुंभ, पावस प्रसंग संगीत समारोह, छत्तीसगड राज्य शासनाचा कला महोत्सव, महाराष्ट्र मंडळ, रायपूर, संगीत प्रेमी मंडळ, उत्तरायण ज्येष्ठ नागरिक मंडळ, ठाणे, अखिल भारतीय गांधर्व मंडळ, गांधर्व नाद, मुंबई, नेशनल सेंटर फॉर परफोर्मिंग आर्ट, मुंबई आणि इतर अनेक.आकाशवाणी तर्फे आयोजित संगीताच्या अखिल भारतीय कार्यक्रमात आणि सह्याद्री वाहिनीवर शास्त्रीय संगीताची प्रस्तुती केली आहे. सूरसिंगार संसद मुंबई द्वारा

सूरमणी ही पदवी मिळाली तर शिवराज प्रतिष्ठान, सकाळ वृत्तपत्र, खासदार महोत्सव, आकाशवाणी, दक्षिण मध्य सांस्कृतिक क्षेत्र, राजरत्न पुरस्कार, राज्य शासनाचा उत्तम गायिका अभिनेत्रीसाठी असलेला छोटागंधर्व गुणगौरव पुरस्कार इत्यादी अशा अनेक मान आणि सन्मानानी आणि पुरस्कारांनी गौरविण्यात आले. गायनाबरोबर लहानपणापासूनच अभिनयाची विशेष आवड असल्याने मखमली हे स्वप्न माझे, कट्यार काळजात घुसली, वऱ्हाडी माणसं, गडकरीदर्शन, पंचनायिका, कांचनरंग, संगीत छत्रभारवी, संगीत विलोपले मधुमीलनात या आणि इतर अनेक गद्य व संगीत नाटकात अभिनय करून अनेक पारितोषिके मिळवली आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालय आणि पर्यटन विभागातर्फे ''भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत गुण गौरव पुरस्कार आणि शिष्यवृत्ती पुरस्कार'' या समितीवर तीन वर्षे सदस्य म्हणून नेमणूक केली होती.

विदर्भातील नामांकित एल्. ए. डी. महाविद्यालयातून संगीत-विभाग-प्रमुख म्हणून निवृत्त झाल्या आहेत. जवळजवळ पंधरा (१५) संशोधक विद्यार्थीनींनी चित्रा यांच्या मार्गदर्शनात आचार्य (Ph.D) पदवी प्राप्त केली आहे. गायनक्षेत्रांत अनेक विद्यार्थीनी तयार केल्यात. काही वर्षे कीर्तन केसरी भाऊसाहेब शेवाळकर संगीत महाविद्यालयाचे (पूर्वीचे बुटी संगीत महविद्यालय) प्राचार्यपद भूषविले. अनेक विद्यापीठांच्या विविध समित्यावर मान्यवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती.

---

## शाला प्रशासक – लता थेरगांवकर

तो काळ होता मुलींचे लग्न कमी वयात करण्याचा !

अवघ्या विसाव्या वर्षी माझे लग्न झाले आणि एकविसाव्या वर्षी मातृत्वही लाभले. लग्नानंतरची दहा वर्षे एक उत्तम गृहिणीचे कर्तव्य पार पाडले. दरम्यान १९७८ ला बी.एड्.ची परीक्षा देऊन १९७९ वर्षीपासून आर्मी नर्सरी स्कूलमध्ये झाशीला शिक्षिका म्हणून रुजू झाले. या क्षेत्रात नवखी असल्यामुळे ती शाळा माझ्यासाठी अनुभवातून शिकण्याची शाळा होती. शाळेची वेळही कमी असल्यामुळे मुलांच्या संगोपनावर त्याचा काही विपरीत परिणाम झाला नाही. शाळा नर्सरी ते दुसरी पर्यत असल्याने सर्वच विषय शिकवावे लागले.

नंतरचा पडाव पश्चिम बंगाल मधील कॅलिंगपांग येथे आर्मी शाळेत शिकविण्याचा. या शाळेत मजेदार गोष्ट ही की तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना एकाच वर्गात शिकवावे लागले कारण विद्यार्थी संख्या फारच कमी होती. त्या वर्गात शिकविताना तारेवरची कसरत काय असते याचा अनुभव घेतला. येथे जवळपास अडीचवर्षे नोकरी केली. जाता जाता व्यवस्थापनाचाही अनुभव मिळाला कारण

मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी मिळाली.

शिक्षिकेचा खराखुरा अनुभव पुण्याच्या सेंट मीरा स्कूलमध्ये घेतला जेथे एका वर्गात विद्यार्थी संख्या ६० ते ६५ होती. जिल्हापरिषदेची ही शाळा साधू वासवानी यांच्या विश्वस्तांकडून चालविली जात होती. येथे गणित व विज्ञान शिकविण्याची संधी मिळाली. एका अर्थाने माझ्या गणित विषयाला न्याय देता आला. सरकारी शाळा असल्याने सरकारी खाक्या काय असतो याची ओळख पटली. नोटा कशा लावायच्या येथपासून अनेक शाळाबाह्य कौशल्ये येथे शिकावयास मिळाली यानंतर दिल्लीच्या सी.बी.एस.ई. शाळेत शिकविण्याचा अनुभव घेतला. १९९४ पासून गणिताची पुस्तके लिहिणे सुरू झाले. पाठयपुस्तके, कार्यपुस्तिका , बौद्धिक गणित अशी एकूण ४० पूस्तके माझ्या नावावर आहेत.

१९९० साली एम्.एड्.च्या परीक्षेत ग्रुप अ घेऊन गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावला. व्यवस्थापन आणि नियोजन हा विषय घेऊन सर्वोच्चस्थान पटकवणारी मी पहिली विद्यार्थिनी ठरली. त्यानंतर विशाखापट्टणम येथील नेव्हल पब्लिक स्कूल येथे प्राचार्या म्हणून रुजू होऊन शाळेला शिस्त लावली. २००२ पासून मधला काळ वगळता सांदीपनी शाळेत आजतागायत कार्यरत आहे.

एक संगीतप्रेमी डॉक्टर आणि सैनिकाची पत्नी म्हणून मिरवताना आजही अभिमान वाटतो. मुलगा देखील याच पेशात आहे. कविता करण्याचा छंदही कॉलेज जीवनापासून लागला. मासिके, वर्तमानपत्रे याबरोबरच व्हर्सेलाईट या काव्य संग्रहात माझ्या कवितांचा समावेश आहे. ऑरेंज सिटी न्यूज या एजन्सीत संपादक पद सांभळण्याचा अनुभव आला.

जाता जाता एक अनुभव सांगितला नाही तर हा प्रवास अपूर्ण ठरेल. १५ १६ वर्षाची असताना वडिलांबरोबर फिरायला काश्मीरला गेलो होतो तेथे ‘मेरे सनम’ या चित्रपटातील ‘पुकरता चला....’ या गाण्याचे चित्रीकरण सुरू होते. आशा पारेख या नटीबरोबर सायकल चालवणाऱ्या मुलींची गरज होती. पुण्याच्या आयुर्वेदिक कॉलेजच्या विद्यर्थिनी तेथे आल्या होत्या. त्यांनी चित्रीकरणात भाग घेशील का? असे विचारताच लगेच होकार दिला. या चित्रपटात झळकण्याचे भाग्यही मला लाभले. त्या काळात ही फार आश्चर्याची गोष्ट होती. असा जीवनप्रवास सुरू आहे. आनंदी राहणे हा एक पर्याय आहे, तो तुम्हालाच निवडायचा आहे. या विचारानुसार आनंदी राहण्याचा प्रयत्न करते.

---

**मार्च २०२३ मधील महत्त्वाचे दिवस –**

७-८ होळी-धूळवड, ८ जागतिक महिला दिन, २२ गुढीपाडवा, २७ रामनवमी

---

## डॉ. स्वाती हिरूरकर-धर्माधिकारी

**कार्यकारी प्राचार्य, मानसशास्त्रज्ञ-समुपदेशक, लेखिका, मोटीव्हेशनल स्पीकर, वैद्यकीय व मनोचिकित्सा समाजकार्यकर्ता, लेखिका-कवयित्री,'न लिहिलेली पत्रे' या फेसबुक पेजची संपादक.**

सूक्ष्मजीवशास्त्र विषय घेऊन मराठवाडा विद्यापीठामधून पदवी घेतली, त्या वेळेस वडील तेथे जज म्हणून पोस्टेड होते. शासकीय महाविद्यालयात पदवी घेत असतानाच हस्तलिखितातील कवितेला पारितोषिक मिळाले. वडिलांची नागपूरला बदली झाली आणि आयुष्याला एक नवे वळण लागले. मानसशास्त्राचे नवे दालन खुणावू लागले. त्यात एम.ए.आणि एम.फिल.करताना हेच आपले कार्यक्षेत्र ही खूण गाठ पक्की झाली कारण त्यात दोन्ही परीक्षांमध्ये विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळाला.

मातृ सेवा संघात त्यावेळेस असलेल्या इंदुताई गंधे, डॉ. तायल व अन्य दिग्गजांनी नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा येथे कार्यकरण्याकरिता प्रेरित केले आणि अर्धवेळ नोकरी व एम.फिल.करत क्षेत्रातल्या मुसाफिरीला एम्. ए.चा निकाल लागण्याआधीच १९८८ मध्ये सुरुवात झाली. हैद्राबाद येथील ठाकूर हरिप्रसाद इन्स्टिट्यूटमध्ये न्युरोडेव्हलपमेंटली हँडीकॅप्ड मुलांच्या पुनर्वसनासाठीचा डिप्लोमा घेतला, तिथे असतानाच तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयात मानसशास्त्र विषयासाठी जागेची जाहिरात बघितली, तिथे सिलेक्शन होऊन १९९० साली प्राध्यापक म्हणून रुजू झाले. आज गेली ३२ वर्षे अध्यापनाचे कार्य सुरू आहे. त्याअंतर्गत महाविद्यालयाला 'ए' प्लस श्रेणी मिळवून दिली. आज स्वायत्तता असलेल्या महाविद्यालयाच्या अभ्यासमंडळ, विद्वत् परिषदचे अध्यक्षपदाची जबाबदारी आहे. फायनान्स आणि गव्हर्निंग बॉडीची सदस्य आहे. त्या अंतर्गत रोटरी इंटरनॅशनलने प्रायोजित केलेला स्कूल कौन्सेलिंगचा डिप्लोमा, ॲडव्हांस्ड डिप्लोमा इन कौन्सेलिंग, डिप्लोमा इन सीएस्.आर्. अशा विविध नाविन्यपूर्ण सात अभ्यासक्रमाची रचना आणि सुरुवात केली.

समुपदेशनाचे कार्य सुरू केले, विविध विषयांवर कार्यशाळा, परिषदा चर्चासत्र आयोजित करणे व सर्वसामान्य पालक ते जजेस, डॉक्टर्स, पोलिसांसाठी प्रशिक्षण देणे देखील सुरूच होते. असंख्य शासकीय, खाजगी स्वयंसेवी संस्थांशी संपर्क आला त्यातूनच सल्लगार म्हणून देखील कार्य करता आले. श्रद्धानंद अनाथालयातील घोटाळ्यामुळे तिथे मुंबई हायकोर्ट कमिटी व्यवस्थापनाकरिता गठीत करण्यात आली त्यामधील नामनियुक्ती आयुष्याला परत एक वेगळे वळण देऊन गेली. नागपूर जिल्हा बाल न्यायमंडळवर नाम नियुक्ती झाली. बालहक्क,

महिलासक्षमीकरण, एड्स जागृती, एल.जी.बी.टीक्यु हक्क, मनोरुग्णांचे पुनर्वसन, विकालांगांचे हक्क पुनर्वसन अशा असंख्य जिव्हाळ्याच्या विषयांवर आजही काम सुरू आहे.

काम करताना आलेले अनुभव लिहून काढणे गरजेचे वाटल्याने उमलताना, पालवी, वाटा कौन्सेलिंगच्या, तृष्णा अशी पुस्तके लिहिली गेली. त्यांची काही ऑडीओबुक्स देखील उपलब्ध आहेत. २००५-६ दरम्यान लोकमतच्या एकाच वेळी अकरा एडिशन्स मधून प्रसिद्ध लेखमालिका नंतर हेल्पलाईन परीक्षेची या पुस्तकरूपात उपलब्ध आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या ताणतणावाला कसे हाताळायचे यावर मार्गदर्शन आहे. आजही हेल्पलाईनद्वारा टेलीकौन्सेलिंग आणि स्वतःच्या समुपदेशन केंद्रात काम अव्याहतपणे सुरू आहे. अनेक प्रमुख वृत्तपत्रांतून लेखन, आकाशवाणी, टीव्ही इत्यादी प्रसारमाध्यमे आणि फेसबुकसारख्या समाज-माध्यमांवर भरपूर सकारात्मक लिखाण केले.

'मन' या मालिकेमध्ये समुपदेशन, मानसिक आजार आणि उपाय अशा असंख्य विषयांवर ६० हून अधिक स्टेजशोमध्ये मानसशास्त्रतज्ञ म्हणून सहभाग. भरोसा पोलिससेल येथे मानद मानसोपचार तज्ञ म्हणून सेलच्या सुरुवातीपासून कार्य, महाराष्ट्रातील भरोसासेल मधील समुपदेशकांचे प्रबोधन.

'न लिहिलेली पत्रे' या पेजच्या संपादनादरम्यान जवळपास ५० देशात हे लिखाण वाचले जात आहे, तसेच १५० पेक्षा अधिक लेखक या पेजशी जुळले आहेत.

--------------------------------------------

## डॉ. भारती जयंत सुदामे

**शिक्षण :** बी. कॉम, एम ए. एम.एड्. 'विद्यावाचस्पती' (पीएच्.डी) शिक्षणशास्त्र, पुणे विद्यापीठ, 'वाङ्मय आचार्य' (पीएच्.डी) हिंदी, नागपूर विद्यापीठ, 'हिंदी साहित्यरत्न' अलाहाबाद आणि 'हिंदी राष्ट्रभाषारत्न' वर्धा.

**व्यवसाय :** अध्यापन. ३५ वर्षांचा अनुभव. प्राथमिक ते अध्यापक महाविद्यालय स्तरापर्यंत. सांप्रत निवृत्त प्राचार्य-सिंहगड शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे.

**साहित्यिक उपलब्धी :** आजवर मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये मिळून ३० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'प्रणवीर महाराणा प्रताप', (आठवी आवृत्ती) 'अस्त्रवेत्ता द्रोणाचार्य', 'कबीरायन', 'भृगुनंदन' आणि कृष्णद्वैपायन महर्षी वेदव्यास या कादंबऱ्या, 'जाहला उशीर', 'रीठ' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. अनेक मराठी, हिंदी भाषेत पुस्तके लिहिली. त्या सर्वांची नोंद करणे कठीण आहे.

अनेक संस्थांकडून साहित्यासाठी महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झाले.

'भृगुनंदन' या कादंबरीला, आणि 'स्वामी अपरांताचा' या पुस्तकाला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. या संस्थेतर्फे, अनुक्रमे २०१८ व २०२० या वर्षांचा, मृत्युंजयकार शिवाजी सावंत स्मृती पुरस्कार प्राप्त झाला आहे. या शिवाय 'भृगुनंदन' या कादंबरीला ग्रंथालय भारतीचा उत्कृष्ट समाजप्रबोधनात्मक साहित्याचाही पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे हे विशेष महत्त्वाचे.

हिंदीतून लिहिलेल्या, 'भृगुनन्दन-भगवान परशुराम की यशोगाथा' या कादंबरीसाठी, जबलपूरच्या 'पाथेय' आणि हिंदी साहित्य संगम या संस्थांनी अनुक्रमे 'अध्यात्मश्री' आणि 'सृजनश्री' या अलंकरणाने नुकतेच सन्मानित केले आहे.

'कृष्णद्वैपायन महव वेदव्यास' या कादंबरीला, विदर्भ साहित्य संघ या संस्थेचा 'विशेष शताब्दी पुरस्कार' प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र व इतर प्रदेशात भाषणे झालीत.

व्याख्यानात प्रामुख्याने, सामाजिक विषयांच्या व्यतिरिक्त 'महाराणा प्रताप', 'द्रोणाचार्य', 'रामायण', 'महाभारत', 'वेदकालिन स्त्रिया', 'धर्म अध्यात्म आणि जीवन', 'सप्तचिरंजीव', 'श्रीअरविंद प्रणीत अक्षर वाङ्मयातील तत्त्वज्ञानाचे विविध पैलू', 'हिंदी-मराठीचे नामवंत साहित्यिक आणि त्यांचे साहित्य' हे समाजिक सर्व सामान्य विषय आणि विद्यार्थी व शिक्षकांसाठी, 'शिक्षणक्षेत्रातील आधुनिक विचारप्रवाह', 'विविध अध्ययन-अध्यापन पद्धती' आणि 'गुणवत्ता विकास कार्यक्रम' हे विषय असतात.

श्रीअरविंद विचार मंच या यूट्यूब वाहिनीवर, महायोगी श्रीअरविंदांच्या अक्षर वाङ्मयावर तत्त्वचिंतनात्मक विचार नियमितपणे प्रसारित होत असतात.

---

## आरोहच्या – विशाखा राव

**– शोभा पारळकर**

विशाखा राव ह्यांचे नाव, स्त्रीसक्षमीकरण व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात, विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये सर्वश्रुत आहे.

बी.ए. व एम. बी. ए. चे शिक्षण घेतल्यावर स्वत:च्या नोकरीचा विचार न करता, आदिवासी व ग्रामीण क्षेत्रातील महिलांना स्वयंरोजगार देऊन आत्मनिर्भर कसे करता येईल, ह्यावर विचार केला व त्यांच्यासाठी 'आरोह स्वयंसेवी संस्था' स्थापन केली. येथे निरनिराळ्या कार्यशाळा घेऊन, पारंपरिक कौशल्य, आजूबाजूला उपलब्ध कच्चामाल, परिसराची व गावाची गरज, पाण्याची व बाजारपेठेची सोय त्यांचा अभ्यास केला. महिलांना झेपतील असे, अन्नप्रक्रिया, शिवणकाम, गांडूळखत-

निर्मिती, जैविक खत, बांबूकाम, सामूहिकशेती, पापड उद्योग, सॅनिटरी नॅपकिन्स व झाडू बनवणे यासारखे असंख्य उद्योग, महिलांकरवी करवून घेऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. जंगलात उपलब्ध लाख, चारोळी, मध, बिब्बा इ. गोळा करून त्याची विक्री करण्याची सोय केली. वरील सर्व उद्योगांना बाजारपेठ मिळवून देण्याचे मोठेच काम विशाखाताईनी केले. ज्यामुळे स्त्रिया अर्थार्जन करू लागल्या व त्याचा आत्मविश्वास वाढला.

अनेक मोठमोठ्या संस्थांना मॅनेजमेंट क्षेत्रात विशाखाताईंनी मोलाची मदत केली. रोटरी क्लब व विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनच्या त्या अध्यक्षही होत्या.

पर्यावरणाचा दिवसेंदिवस होणारा ऱ्हास व त्याबद्दलची बेपर्वा वृत्ती व अज्ञान पाहून त्या अस्वस्थ झाल्या व २००७ साली त्यांनी 'आरोह' संस्थेत 'हिरवाई ग्रुप'ची सुरुवात केली. याअंतर्गत शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी 'हिरवाई ग्रीन स्कूल अवार्ड' सुरू केले. मुलांना वृक्षलागवड व संवर्धन शिकवून अनेक 'ग्रीन ॲम्बेसिडर्स' तयार केले व त्यांच्याकडून स्थानिक प्रजातीची १०,००० झाडे लावण्यात आली. या विषयाचे महत्त्व कळण्यासाठी विशाखाताईंनी एक व्हिडिओ देखील तयार केला. ज्याचा ह्या विषयाचा प्रचार-प्रसार करण्यात खूप उपयोग झाला. त्यांनी लावलेले हे जंगल सर्वांना प्रेरणादायी आहे. विशाखा राव यांच्या वाटचालीस अनेक शुभेच्छा!

---

## दिव्य दृष्टी – जिज्ञासा

**– शोभा पारळकर**

जिज्ञासा कुबडे चवलदाळ यांचा परिचय करून देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. त्या अत्यंत तडफदार व हरहुन्नरी युवतीला 'दृष्टिहीन' म्हणणे किती अयोग्य आहे हे त्यांचा परिचय वाचल्यावर आपल्या लक्षात येईल.

जिज्ञासाचा जन्म १७-११-१९७० चा. शालेय शिक्षण पूर्ण करून कॉलेजात प्रवेश करताच तिची दृष्टि हळुहळू कमजोर होत गेली. व वर्षीच्या १८ व्या वर्षीच दुर्दैवाने तिला पूर्ण अंधत्व आले.

तिला व तिच्या सुविद्य पालकांना हा मोठाच धक्का होता. परन्तु ह्या मानसिक आघातावर मात करण्यासाठी जिज्ञासाने संगीत व योग, निसर्गोपचार यांचा अभ्यास सुरू केला व प्राविण्यही मिळवले.

स्वतःच्या व्यंगांचा विचार पूर्णपणे बाजूला ठेवून तिने इतर दिव्यांग व्यक्तींना योगासने शिकवणे सुरू केले. योग व रेकीचा अभ्यास जिज्ञासाला कै. बाबा आमटे ह्यांच्या आनंदवनात, मंदबुद्धि व कुष्ठरोग्यांना योगासने शिकवताना उपयोगी पडला. काही वर्षे जिज्ञासाने तिथे राहून योग प्रशिक्षक व काउंसेलर म्हणून कामही केले.

आधुनिक शिक्षण पद्धतीत संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक आहे हे लक्षात आल्यावर, जिज्ञासाने संगणकशास्त्राचा सखोल अभ्यास केला व अंधांसाठी कम्प्यूटरचे शिक्षण शक्य करून दाखवले.

मे फ्लावर शाळेत तिने काही वर्षे सहशिक्षक म्हणून विनावेतन काम केले. शिक्षणात मंदगती असणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत केली. पुढे महाराष्ट्र सरकारने इंडस्ट्रियल ट्रेनिंग मध्ये अंधासाठी कम्प्यूटर ट्रेनिंग हा विषय नेमावा ह्यासाठी सरकार दरबारी पाठपुरावा केला. हा विषय शिकविणारी जिज्ञासा ही एकमेव व्यक्ती आहे तिने शिकवलेले अनेक विद्यार्थी आज आरटीओ व बँकांमध्ये कार्यरत आहेत.

नागपूर येथील 'सक्षम' व आत्मदीपम् संस्थेच्या त्या माननीय सदस्य आहेत. सरकारी नोकऱ्यांसाठीच्या प्रवेश परीक्षांची तयारीही त्या दिव्यांग व्यक्तींकडून करवून घेतात. अनेकांना विविध पुनर्वसन कार्यक्रमांद्वारे त्यांनी रोजगार मिळवून दिले आहेत. इतकेच नव्हे तर स्मार्टफोनचा वापर व गॅस न वापरता करता येणारे पदार्थ करणे ही त्यांनी अंध व्यक्तीना शिकवले.

त्यांच्या ह्या कामासाठी त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. रोटरी क्लब नागपूर कडून Vocational Exellence Award, स्त्री-सक्षमीकरण प्रयास पुरस्कार तर कमलाताई होस्पेट स्त्री सहाय्यक मंडळ तसेच नागपूरच्या म.न.पा सभापतीकडून मिळाले. 'जीवनदृष्टी पुरस्कार' हा वेद वासुदेव प्रतिष्ठानाकडून व नागपूर महिला क्लब कडून 'तेजस्विनी' पुरस्कार मिळाला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव ही अनेक संस्थांनी केला. त्यांच्या पुढील वाटचालीकरिता अनेक शुभेच्छा. त्यांचे कार्य असेच सर्वांना प्रेरणा देत राहील अशी आम्हाला खात्री आहे.

जिज्ञासाचे माता पिता, बंधू, त्यांचे पती श्री. योगेश्वर चवलढाल व मुलगी देवांशी ह्यांचेही तिला मोलाचे सहकार्य मिळाले, त्या सर्वांचेही अभिनंदन.

---

## असामान्य प्रतिभेच्या दुर्गा पारखी

श्रीमती दुर्गा पारखी ह्यांचे नाव संस्कृत अध्ययन व अध्यापन क्षेत्रात आदराने घेतले जाते. त्यांच्या नानाविध उपलब्धींचा आलेख त्यांच्याच शब्दांत -

आमच्या काळात ११ वी मॅट्रिक होतं. चांगल्या मार्कांनी पास झाले, तर पुढे कॉलेजला घालायचे आणि अधेमध्ये चांगला मुलगा मिळाला तर लग्न करून टाकायचे. असा बऱ्याच पालकांचा विचार असायचा. पण मी चांगली पास झाले व त्यामुळे माझे बी. ए. पर्यन्तचे शिक्षण पार पडले. पुढे एम्.ए. ला प्रवेश घेण्याचा विचार केला. माझा आवडता विषय संस्कृत म्हणून मी तोच घ्यायचे ठरवले. बी. ए. ला बसणारे हजारो विद्यार्थी, त्यांत पहिला क्रमांक मिळवणे अगदीच अशक्य.

पण पुढे एम्. ए. ला संस्कृत विषय घेणारे १५-२० विद्यार्थी असत, त्यामुळे माझा पहिला क्रमांक आला व मला आकाश ठेंगणे झाले.

मी लगेच बी. एड्. देखील केले. नंतर लक्षात आले की, संस्कृत विषय काही मोजक्याच शाळांमध्ये शिकवला जातो. सुदैवाने मला सी.पी.ॲन्ड बेरार हायस्कूलमध्ये शिक्षिकेची नोकरी मिळाली. संस्कृत माझा आवडीचा विषय म्हणून विद्यार्थीही माझ्या शिकवण्याकडे आकृष्ट झाले.

मग मी त्यांच्यासाठी वाघा-सिंहांच्या, चिमणी-कावळ्यांच्या गोष्टींची ५-१० मिनिटांची, संस्कृत नाटके रचू लागले. त्यांचेच एकत्रित रूप म्हणजे 'बाल नाट्य वल्लरी' नावाचें पुस्तक!

पुढे मुलांना आवडतील असे उखाणे/कोडी संस्कृत भाषेत रचून 'संस्कृत प्रहेलिका' हे पुस्तक लिहिले व ते लोकप्रिय झाले. नंतर गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर ह्यांच्या 'काबुलीवाला' ह्या प्रसिद्ध कथेचे संस्कृतात नाट्यरूपांतर केले. नाट्यरसिकांनी त्याचा प्रयोग सादर करून यश प्राप्त केले.

नागपूर आकाशवाणी वरून सादर होणाऱ्या कथावाचनाच्या कार्यक्रमात माझ्या काही कथा वाचल्या गेल्या व पुढे त्यांचे संकलन करून 'कथासुमनसौरभम्' या नावाने छापल्या.

संस्कृत शिकताना विद्यार्थ्यांना विभक्ति, वचन हे नीट कळत नाही त्यांच्यासाठी एक तक्ता तयार केला ज्यामुळे संस्कृत वाक्यांची रचना करणे त्यांच्यासाठी सोपे झाले. संस्कृत विषयाची, विद्यार्थ्यामध्ये आवड निर्माण करणे हाच माझा हेतू आहे. मी संस्कृतचे अध्यापन अजूनही आवडीने करते व तेही अगदी विनामूल्य!

---

## सूरश्री कल्याणी देशमुख

**- शुभांगी विठाळकर**

डॉ. कल्याणी देशमुख म्हणजेच पूर्वाश्रमीची नीलांबरी मनोहर बर्वे. माझी मोठी बहीण नीलू? हो, अजूनही ती आमच्या पूर्वीच्या लोकांमध्ये याच नावाने ओळखली जाते. लहानपणी नीलू खेळकर, खट्याळ, थोडी खोड्या करणारी होती. तसाच तिचा स्वभाव थोडा आग्रहीपण होता. ठरविलेली गोष्ट ती करणारच मग त्याकरिता आपली बाजू पटवून द्यायची. गाण्यासाठी तिला उपजतच अत्यंत गोड, सुरेल आवाज लाभला होता.

आमच्या वडिलांच्या शब्दात सांगायचे तर आवाजाची ईश्वरी देणगीच तिला मिळाली होती. सुरवातीला नीलूची आवड सुगम संगीताकडे जास्त होती. भावगीत ती उत्तमरीत्या गायची परंतु घरात सतत शास्त्रीय संगीत चालू असल्याने

केवळ श्रवणानेच तिने व माधवीने (सर्वात मोठी बहिण) शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले.

रोज संध्याकाळी वडिलांबरोबर दोघींचा रियाज होत असे. पुढील वर्षांत नीलूचे लग्न नागपूर विद्यापीठात कार्यरत प्रबोधचंद्र देशमुख यांच्याशी झाले. आता कल्याणी पूर्णपणे शास्त्रीय संगीत गात होती. गाण्याबरोबरच तिने मानसशास्त्रात डॉक्टरेट (Ph.D.) झाली आणि धरमपेठ महाविद्यालयातीत मानसशास्त्र विभागाची प्रमुख म्हणून निवृत्त झाली. या सर्व घडामोडी चालू असताना नीलूची संगीतात उत्तरोत्तर प्रगती चालूच होती. शास्त्रीय संगीताच्या मैफिली होतच होत्या. आकाशवाणी नागपूरची ती 'अ' श्रेणीची कलाकार आहे. आकाशवाणी व दूरदर्शनवर अनेकदा शास्त्रीय व उपशास्त्रीयगायन तिने सादर केले आहे. लहानपणापासूनच नीलूला नकला, अभिनय करणे आवडायचे. संगीत आणि अभिनय याची सुरेख सांगड तिने तिच्यात साठवली आहे. तिने श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर दिग्दर्शित नाटक 'नयन तुझे जादुगार' या नाटकात, त्या नंतर डॉ. राम म्हैसाळकर दिग्दर्शित 'संगीत संशयकाल्लोळ', 'संगीत मानापमान', 'संगीत स्वयंवर' त्या संगीत नाटकांमधून प्रमुख नायिकेच्या भूमिका प्रेक्षकांपुढे सादर केल्या. उपशास्त्रीय संगीताची अशी यशस्वी कारकीर्द असूनही कल्याणीने शास्त्रीय संगीतालाच प्राधान्य दिले. आकाशवाणीतर्फे शास्त्रीय व उपशास्त्रीय (नाट्यसंगीत) संगीत तिने संपूर्ण देशात सादर केले. बालगंधर्व शताब्दी निमित्त सुहासिनी मुळगावकर दिग्दर्शित वर्षभर दाखविल्या जाणाऱ्या मालिकांपैकी एका मालिकेत अभिनयासहित नाट्य संगीत सादर केले. बालगंधर्व रसिक मंडळ, पुणे यांचेकडून बालगंधर्व पुरस्कार तसेच महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक विभागातर्फे उप- शास्त्रीय नाट्य संगीताच्या भरीव योगदानासाठी राज्यस्तरीय पुरस्कार तिला मिळाला आहे.

संसार, नोकरी आणि सातत्याने संगीत चालू ठेवण्यासाठी कल्याणीला देशमुख कुटुंबाकडून भरपूर साहाय्य मिळाले. सासूबाई इंदूताई देशमुख या स्वत: सामाजिक कार्यात अग्रभागी असत. अनेक वर्षे त्या नागपूर मातृसेवासंघाच्या सचिव म्हणून कार्यरत होत्या. पती प्रबोध यांचे सक्रिय सहकार्य तर नेहमीच असते. नीलूच्या सांगतिक जीवनाचा प्रवास मी लहान बहीण असल्याने प्रथम अनुभवला आहे. आम्हा बर्वे देशमुख कुटुंबियांना तर तिचा सार्थ अभिमान आहे. तिच्या मधुर व दर्जेदार गायनाने श्रोत्यांना नेहमीच खूप आनंद दिला आहे.

महाराष्ट्रातील प्रमुख महिला शास्त्रीय गायकांमध्ये कल्याणी गणली जाते. मी संगीत साधनेलाच साध्य उद्दिष्ट मानून आयुष्याची वाटचाल करीत आहे.

---------------------------------------------

# माझी ओळख..... ऋतुराज

ऋतुराज ला जन्म देऊन आज जवळपास तेरा वर्षे झालीत. मला संगीताचे बाळकडू आईकडून लहानपणापासूनच मिळाले! ऋतुराजला जन्म देताना एक संकल्प निश्चितच मनात होता. पण त्यापूर्वीही ऋतुराजच्या जन्माचे कारणही सांगायलाच हवे. माझा एक भाऊ मी काळाच्या ओघात गमावला होता. तो उत्तम डॉक्टर, कलाप्रिय होता. त्याच्या अपघाती मृत्यूचा धक्का जबरदस्त होता. सैरभैर झाले होते मी! पण नेमकं त्याच वेळी गुणवंत घटवाई या असामान्य गायन प्रतिभा असलेल्या कलावंताशी माझी ओळख झाली आणि काही दिवसातच असं लक्षात आलं की मी त्यांच्यात माझा भाऊ शोधतेय.... नातं घट्ट व्हायला वेळ लागला नाही. मग एक ठरवलं की ह्या वादळाला आपण त्याच्या सोलो कार्यक्रमाच्या चौकटीत बांधायचं. काहीतरी वेगळं करायची उर्मी तर होतीच! तसे संगीतमय कार्यक्रम करणाऱ्या समूहांची कमी नव्हतीच पण नेहमी जसे कार्यक्रम होतात तसे न करता या प्रोग्राम मधून समाजप्रबोधन झालं पाहिजे असं ठरवलं !

मन ! असतं सगळ्यानाच पण त्याकरता आपण किती वेळ देतो? ह्या मनाला किती जाणून घेतो? मानसिक अस्वस्थता म्हणजे काय? शारीरिक आजारपण आले की डॉक्टरकडे जातो ....औषधोपचार करतो.... पण मन अस्वस्थ आहे.... मानसिक दौर्बल्य आहे? जायचं का मानसोपचारतज्ञाकडे? समुपदेशन करायचं का? हा विचार आपण करतो का? त्याचं उत्तर ठाम! नाही असंच आहे. कारण मानस उपचार म्हणजे वेडी झालेली माणसं..... हे एक समीकरण सुशिक्षित म्हणवून घेणारेही मान्य करतात. ही कोंडी कुठेतरी माझ्या डोक्यात रेंगाळत होतीच. मला माझ्या दुःखातून, अस्वस्थतेतून सावरण्यास संगीताची साथ लाभली! त्यातून ऋतुराज जन्माला घालायचं ते अशा वेगळ्या संकल्पानेच हे ठरलं!

सुदैवाने माझे पती नितीन तापस घरच्या मुद्रण व्यवसायतले तज्ञ असले तरी ह्या बाबत रसिक आहेत. तसेच ते आणि माझे कुटुंबीय ह्या उपद्व्यापाच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. मग आपल्या ह्या संकल्पनांना मूर्त रूप देणारे कोण ह्याचा शोध घेतला. गायक, वादक ह्यांच्या सोबत तज्ञ आणि त्यांना अष्टप्रधान बोलतं करणारं उत्स्फूर्त सूत्रसंचालक अशी फौज निर्माण करावी लागणार होती. त्यांना मानधन तर द्यावं लागणार हे पक्क ठरलंच होतं..... मग डॉ. शैलेश पानगावकर, मानसशास्त्राचा सखोल अभ्यास, जोडीला अध्यात्मिक बैठक, डॉ. प्रा. स्वाती धर्माधिकारी समुपदेशनाचा गाढा अनुभव, ही जोडी मस्त जमली. डॉ. मंजिरी वैद्य-अय्यर ही गुणी गायिका जवळ आली. गोविंद गडीकर, मोरेश्वर दहसहस्त्र, विशाल दहासहस्त्र हे वादक कायमचे जमले आणि बऱ्याच कलाकारांची साथ मिळाली ... प्रकाश भंडारे ध्वनी

घेऊन पक्का चिकटला. अशी चमू मस्त जमली. आणि एका व्यक्तीचा उल्लेख केला नाही तर अपूर्णता राहील. घर कसं बांधायचं हे ठरलं..... पण ते आकाराला आणणं ही जबाबदारी स्ट्रक्चरल डिझायनरची असते....तसे किशोर गलांडे जिव्हाळ्याने जमले. सगळे आपआपल्या ठिकाणी पक्के! मग सुरू झाली आगळ्या वेगळ्या संगीतमय कार्यक्रमांची मुशाफिरी! मन ! जाणून घेऊ या मनाला....चर्चेसह.... आवडत्या गीतांसहित.... मजा आली! मग ऋतुराजने बाळसं धरायला सुरुवात केली. केवळ मन नाही तर तिचं मन, नको रे मना, शुभ मंगल सावधान, मन पैलतीर, ....काय काय संकल्पना सुचत गेल्या... आकाराला आणत गेले आणि म्हणता म्हणता त्याच्या तेरा संकल्पना तयार झाल्या. पुढच्या कार्यक्रमाची उत्कंठेने विचारणा करणारे रसिक, त्यांची शाबासकी...हीच ऋतुराज खास कमाई आहे... असं मी समजते. केवळ विदर्भातच नाही...मुंबई, दिल्ली पर्यंत आम्ही दौड मारून आलोय.... अनेक मान्यवर जोडल्या गेलेत, निस्सीम प्रेम करतात.

लैंगिक विषयांवर चर्चा ही तर चांगल्या चांगल्या घरात होत नाहीत. घरात मुलगी वयात आली की आई तिला ताब्यात घेते.... मुलाचं काय? बाप त्याच्या समस्या सोडवत नाही.... ह्याला तर थेट स्टेजवर मांडण्याचा विचार धाडसाचाच... पण डॉ. संजय देशपांडे सारख्या लैंगिकरोग तज्ञांची साथ मिळालीआणि युवक - युवती सहजीवन! या कार्यक्रमाची निर्मिती झाली आणि तेही शिवधनुष्य लीलया पेललं! कमलाबाई होस्पेट स्त्री सहाय्यक मंडळाने या विषयाचा कार्यक्रम उचलून धरला. डायबेटिस.... हृदयरोग..... केवळ नावे सुद्धा अंगावर काटा आणतात....पण ऋतुराजची यशस्वी चमू आणि प्रसिद्ध डॉ. प्रभाकरराव देशपांडे हे समीकरण आम्ही जमवलं.... गोड व्याधी... गोड गाणी, गुंतता हृदय हे.... कार्यक्रम धाडसाने सादर केले.. लोक अंतर्मुख होतात... संयमित जीवन जगायला सिद्ध होतात, हे फार मोठं यश.... माझ्या ऋतुराजचं!

ही माझी वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती आहे! त्याशिवाय मी जगूच शकणार नाही. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचं सामर्थ्य माझ्या या अपत्यानं मला दिलं आहे.... तीचं माझी ओळख आहे.....

इरावती कर्वे यांची सुंदर कथा आहे...परिपूर्ती नावाची! त्या आपल्याच मुलाच्या शाळेत एका कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून गेल्यावर त्यांची यथोचित ओळख करून दिल्यानंतर कार्यक्रम संपल्यावर त्यांची मुलांच्या मित्रांनी ही तर आपल्या कर्वेची आई अशी ओळख करुन दिली तेंव्हा जो आनंद झाला तोच आनंद! ऋतुराजच्या मुग्धा तापस म्हणून मलाही आवडतो!

---

# प्राजक्ता उपाध्याय

संगणकक्षेत्रात गेल्या ३२ वर्षांपासून आम्ही व्यवसाय करीत आहोत. वेगवेगळी कामे करीत असताना एका टप्प्यावर आम्ही एक सॉफ्टवेअर ऍज् सर्व्हिस प्रॉडक्ट तयार केले. याचा लाभ अमेरिकेतील अनेक रूफिंग आणि सोलर कंपन्या घेत आहेत.

हे करीत असतानाच तंत्रज्ञानाशी निगडीत कौशल्ये आणि आमच्याजवळील मर्यादित संसाधने यामधून शक्य असेल ती मदत आम्ही आमच्या संपर्कातील सामाजिक संस्थांना पुरवीत होतो आणि आपली सामाजिक बांधिलकी आपण पूर्ण करीत आहोत याचे समाधान होते. वीस-एक वर्षांपूर्वी निमिषभाई (शाह) आणि रमेश अंकल (कचोलिया) हे मुंबईस्थित व्यावसायिकद्वय भेटले. या लोकांनी समाजात भरीव कार्य करणाऱ्यांना आर्थिक आणि भावनिक पाठबळीशिवाय इतरही अनेक प्रकारांची मदत पुरवली, आजही पुरवतात. समाजकार्य करणाऱ्या लोकांच्या चांगल्या गोष्टी त्यांनी परिचितांसोबत सामायिक केल्या. खूप सारे सहकारी जोडले गेले. केअरिंग फ्रेण्ड्स नावाचा एक अनौपचारिक ग्रुप बनला आणि या कामाचा वेग आणि स्केल वाढत गेली. यांची समरसता आणि हे दाखवत असलेला निर्व्याज विश्वास काम करणाऱ्यांना किती बळ देते हे आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आणि यात आपला छोटासा वाटा उचलायला लागलो.

हळुहळू नागपूर आणि आसपासच्या परिसरातील अनेक तरुण आमच्या सान्निध्यात येत गेले. या संवेदनशील तरुणांपैकी काही प्रत्यक्ष सामाजिककार्य करणारे होते, तर काही व्यावसायिक. काम कुठलेही असो सुरुवातीचा काळ हा धडपडीचाच असतो. अशावेळी पाठीशी कुणी आहे ही जाणीवदेखील उमेद वाढवायला पुरेशी असते. आम्ही या सगळ्यांसोबत काम करायला लागलो. त्यांना जे आर्थिक आणि भावनिक पाठबळ हवे असते, ते देण्याचा प्रयत्न करीत गेलो. त्यांच्या कामाचा वेग, आवाका आणि प्रभाव वाढावा हीच इच्छा यामागे होती/आहे. आपली एखादी संस्था सुरू करून एकाच कुठल्या उद्देशासाठी काम करण्यापेक्षा या सगळ्या तरुणांची स्वप्ने साकारण्यात आपला सहभाग असावा हा मार्ग आम्ही निवडला.

या तरुणांमध्ये शाळाबाह्य मुलांसाठी काम करणारे (फूटपाथवरील मुले, भटक्या जमातीतील, आदिवासी भागांतील मुले), शहरी-ग्रामीण-आदिवासी भागांत आरोग्यावर काम करणारे, लैंगिक अत्याचारांच्या बळी महिलांना आधार देणारे, व्यसनमुक्ती केन्द्र चालवणारे, जंगल आणि वन्यजीवांचे रक्षण करणारे, शिक्षणक्षेत्रात नवे प्रयोग करणारे, सौरऊर्जेवर काम करणारे तसेच कला आणि रंगमंच यासाठी धडपड करणारे कलाकार, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर्स, आर्किटेक्ट्स असे उद्यमीदेखील

आहेत. ही सगळी कामे मोठी, फार मोठी होतील की नाही ठाऊक नाही. पण आज युवावर्गात जबरदस्त ऊर्जा आहे आणि वेगवेगळे प्रयोग करण्याकडे त्यांचा कल आहे. यांच्याकडे बघितले तर युवा पिढीविषयीची अनास्था, उदासीनता नक्कीच दूर होते.

---

## नागपुराला 'अलग अँगल' देणाऱ्या मिली विकमसी

मिली विकमसी, बहुमुखी प्रतिभा की धनी हैं। नागपुर के प्रसिद्ध शिल्पी विकमसी घराने से वे जुड़ी और दूध में शक्करसी घुलमिल गयीं। आपका परिचय देते हुए हमे बहुत खुशी होती है।

उनकी उपलब्धियाँ उन्हीकें शब्दों में:

बहुत पहले, कॉलेज में पढ़ते समय मैने कुछ पंक्तियाँ लिखीं थीं।

जीना चाहती हूँ मै रंगों की दुनिया में ।
मैं रहूँ, रंग रहे साथ उसके कॅनव्हास रहे।
रचूँ मैं चित्र या गढ़ूँ मैं शिल्प
माँ पिता का आशीर्वाद रहे !

मेरे कलाकार जीवन की दूसरी पारी, नागपूर में, मेरी शादी के बाद शुरू हुई। मैंने लखनऊ से मास्टर ऑफ फाइन आर्टस किया। इस दौरान मुझे अनेक अवार्ड, छात्रवृत्ती व ज्युनिअर फेलोशिप, भारत के सांस्कृतिक मंत्रालय की ओर से प्राप्त हुए। अब तक मेरी चौदह एकल चित्र- प्रदर्शनियाँ तथा देश-विदेश में कई ग्रुप प्रदर्शनियाँ हो चुकी हैं।

मेरी शादी कलाकार परिवार में हुई यह मेरा अहोभाग्य है। मेरे पति श्री. ललित विकमशी चित्रकार तथा शिल्पकार हैं। आजका नागपूर उनकी चित्रकलासे सुसज्जित है। मेरे ससुर श्री. हिराचन्द विकमशी को उनके शिल्पों द्वारा नागपूरनगर जानता है। जेठ तनुल विकमशी स्वतंत्र चित्रकार हैं; व कला के अध्यापन से जुड़े हैं।

१८ वर्ष पहले हम सबने 'अलग अँगल' संस्था की स्थापना की थी। जो आज अलग अँगल कम्युनिटी सेंटर के नाम से जाना जाता है। यहाँ हम कला के कई नये प्रयोग करते हुए कलासे जुड़े विद्यार्थियों को प्रेरित करते हैं एवं अध्यापन करते हैं। नागपुरका पहला मेकरस्पेस जो आज मेकर अड्डा के नाम से जाना जाता है, शुरू किया है। यहाँ हम लकड़ी, लोहा यदि माध्यम भी इस्तेमाल करते हैं। संगीत, नाटक, नृत्य कविता आदिमें भी रुची रखते हैं। हाल ही मे मेरी 'मफ्हूम' नामक कविता की पुस्तक छपी है। इसके अलावा मैं शॉर्ट फिल्म्स भी बनाती हूँ।

कहते हुए गर्व महसूस करती हूँ कि मेरी बेटी रिद्धी ने संगीत में अपना भविष्य देखा है, और 'बैठक नागपूर' की स्थापना किया है जो अलग अँगल कम्यूनिटी सेंटर का ही हिस्सा है।

---

## संदेह.... संघर्ष ..... मुक्तता

**डॉ. निर्मला वझे**

कैसे भूल सकती हूँ वो दिन, १ नवम्बर १९८८। Biopsy Report बता रहा है कि मुझे स्तन का कॅन्सर हुआ है। एक क्षण के लिये मैं भी चौंक गयी थी, पर फिर तुरंत संवर गई, मेरे बच्चे, पति इनका खयाल आया और लगा कि इन सब के लिये मुझे जीना ही है। ४ साल पहले मेरी बहन की कॅन्सर से मौत हुई थी, मेरे बच्चों को ३ साल उसीने सम्हाला था। मेरे बच्चों ने मुझसे सवाल किया ''माँ, मौसी की तरह तुम भी मर जाओगी क्या?'' मैने जवाब दिया 'मुझे मालुम नहीं, पर इतना जरूर जानती हूँ की हम सबको ये मेरी बिमारी की लढाई लडनी है। तुम लोगों के सहयोग के बिना मैं अकेले नहीं लड सकती।

बस शुरू हो गई यह लडाई। सबसे पहले ऑपरेशन हुआ, उसके तुरंत बाद जब मैं इडली खा रही थी तो साथ ही भगवान को धन्यवाद दे रही थी। कि मुझे स्तन का कॅन्सर दिया, पेट का नहीं, नहीं तो खाने मे परहेज आ सकता था, मुझे अच्छी तरह याद है, दिवाली के दिन थे वो, आजूबाजू के घरों मे फटाके बज रहे थे, हमारे घर में भले ही बहुत फटाके न बजे हों, पर अंधेरा भी नही था। दिये जलाये, थोडी मिठाईंया मंगाई, हम सबने जैस ठान ली थी कि हम कभी अपने घर में किसी तरह का अंधेरा, निराशा को स्थान नहीं देंगे।

किमोथेरपी जब शुरू हुई तो उल्टीयों के मारे परेशान हो जाती थी। आज से २५ साल पहले उतनी स्ट्राँग दवाईयाँ भी नहीं मिलती थी। उल्टी बंद या कम करने के लिये, सर पूरा गंजा हो गया था।

बहुत सारे खट्टे-मिठे अनुभव आये। सच्ची दोस्तकी पहचान हो गई। कुछ लोग हालचाल पूछने की भी हिंमत नही कर पाते, तो कुछ आते आते रोने लगते और पूछते, ऐसा क्यों हुआ? पहचान वालों या रिश्तेदारों की कॅन्सर से कैसे मृत्यु हुई ये बतलाते। उन्हें ये एहसास भी नही होता कि हम तो मरीज की मानसिक स्थिती को न समझते हुए, उन्हें खुशियोंसे ज्यादा दुख ही पहुँचा रहे है।

कुछ दोस्तों और रिश्तेदारों ने तो पैसों से मदत करने को इनकार किया, ये सोचकर कि अगर मैं मर गई तो उनके पैसे कौन चुकायेगा? हमारी गृहस्थी, हॉस्पीटल, बच्चे और इलाज के लिये पैसों की बहुत जरूरत थी। घर की महंगी

चीजें, सोना, चांदी सब बेचना पडा। मेरे पति को यूके जाना पडा पैसे कमाने के लिए। उसपर हमें बहुत ताने सुनने पडे, हम दोनो ने ठान ली थी कि कोई कुछ भी कहे, हम पैसों का ढोंग या नाटक नही कर सकते। मेरा इलाज पूरा होने के बाद मै फिर से कमाने लायक हो जाऊंगी।

इन कठिन परिस्थितीयों में बहुत से अच्छे दोस्त भी मिले, जिन्होंने हर मुश्किल मे मेरा साथ दिया, दिलासा दिया। अपनी बिमारी की कहानी, निराशा, डिप्रेशन को मैने कभी पास भटकने नहीं दिया। जानती थी कि अगर मै खुद डिप्रेस्ड हो गई तो सारा परिवार दुखी हो जायेगा, घर में सभी त्योहार होने चाहिये यह मेरा आग्रह रहता था, कभी भी मुझे ऐसा नहीं लगा कि मै ही क्यों? मुझे ही क्यों? मैने कोई पाप किया होया, या क्रोध या इनकार.....

एक ही विचार बार बार आता भले ही कि मैने यूके से गायनिक की ट्रेनिंग किया, मुझे स्तन के कॅन्सर के बारे मे बहुत ही कम जानकारी थी। इसलिये मुझे ऐसे काम करने चाहिये जिससे लोगों में इस बिमारी के बारे में जागरुकता पैदा कर सकूँ। उन्हें सतर्क करूँ, कौन्सिलिंग की जरूरत महसूस हुई, उसके कोर्स किये, कॅन्सर का नाम लेते ही लोग भयभीत हो जाते है, उन्हें लगता है कि कैन्सर होने के बाद मौत ही होती है। ऐसे डरावने विचार से उनको बाहर लाने में कौन्सुलिंग जरूरी है। उनको भी जीने का उतना ही अधिकार है। जितना बाकी लोगों को। क्यों न हम कैन्सर को भी बाकी बिमारियों की तरह समझे और इलाज करें?

---

## Twinkle Star Editor - Aasawari Shenolikar

As a highly respected Deputy Editor of The Hitavada who is also the Magazine Editor, Aasawari Shenolikar heads, among other supplements, the one of its kind children's magazine The Twinkle Star. She is a trailblazer in the truest sense of the word! Recognised by name, if not by face, by scores of children and adults above the age of 7 till 70 and even beyond, Aasawari Shenolikar is a beloved name in Central India for her peerless work in heading the incredibly popular children's Magazine Twinkle Star. For the past 30 years, she has dedicated her life to creating a platform for children to express themselves, learn, and grow through the magazine.

The multitasking editor's passion for inspiring children is reflected in the colourful and vibrant pages of The Twinkle Star, which

comes out every Saturday. One of Mrs Shenolikar's most impressive qualities is, her ability to foster a positive and nurturing environment for children. She is always the first one to praise and encourage children to be their best selves, to write well, and to embrace new challenges. Her enthusiasm and positivity have inspired countless children to achieve their dreams.

The Editor of Twinkle Star also imparts important life lessons through her editorials, making it a fun and fundamental way for children to think, learn and grow. In addition to being an excellent editor, Mrs Shenolikar is also a prolific writer, with her biweekly column, "In Jest," being immensely popular among readers.

Her ability to write about important subjects with sensitivity and insight is unparalleled. Her powerful pieces on social issues, lifestyle, and women's empowerment has impacted readers and contributed to important societal discussions. After getting married, the Delhi-born woman moved to Nagpur and joined The Hitavada newspaper 30 years ago. She received guidance and grooming from the Hitavada Editor, Mr. Vijay Phansikar, and continued to be supported by the Managing Editor, Mr. Rajendra Purohit.

Beyond her impressive professional accomplishments, the editor is also known for her warmth, kindness, and generosity. She is always willing to lend an ear, offer advice, or provide support to those around her. Her dedication to her craft and her community are a testament to her character and her commitment to making the world a better place.

---

**शाखावृत्त –**

## मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे 'कॅन्सर जनजागृती' कार्यक्रम

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने मातृ सेवा संघ, सीताबर्डी आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर, ईशान्य यांच्या संयुक्त विद्यमाने नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थींकरिता '१३ वा शैक्षणिक व कॅन्सर जनजागृती कार्यक्रम' दि. १ मार्च २०२३ रोजी मातृ सेवा संघाच्या रंजन सभागृहात साजरा करण्यात आला. नागपूर येथील ७ विविध नर्सिंग केंद्राच्या २०० पेक्षा अधिक प्रशिक्षणार्थी या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थींसाठी घोषवाक्य व भित्तीचित्र प्रदर्शनी आयोजित

करण्यात आली होती. १२ वर्षांपासून या प्रदर्शनीचे आयोजन उत्कृष्टरीत्या करण्यात येते.

रोटरीच्या प्रथम महिला रोटरीयन दर्शना बल्दवा यांनी प्रदर्शनीचे उद्घाटन केले. रोटरीयन लता लद्धा, मीरा मालपानी, दिपा अग्रवाल, डॉ. प्रज्ञा लद्धा, मातृ - सेवा-संघ, सीताबर्डी सूतिकागृहाच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत, नर्सिंग स्कूलच्या प्राचार्या श्रीमती कांचन बांते घोषवाक्य व भित्तिचित्र प्रदर्शनीकरिता परिक्षक म्हणून लाभले होते.

पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून दीपप्रज्वलनाद्वारे कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून आरोग्य सेवेच्या उपनिदेशक डॉ. विनीता जैन लाभलेल्या होत्या. त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयांना महिलांची 'स्क्रिनींग' करण्याकरिता संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. रोटरीचे अध्यक्ष श्री. नरेश बल्दवा म्हणाले की मातृ-सेवा-संघ नेहमीच कार्यक्रमाचे आयोजन करीत असते, आपण असेच कार्यक्रमाचे आयोजन करीत रहा.

जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यकमाची त्यांची प्रशंसा केली व सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मातृ-सेवा-संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख म्हणाल्या की २००७ पासून रोटरी क्लब ऑफ नागपूर द्वारे मातृ-सेवा-संघ, सीताबर्डी येथे 'श्रीमती प्रेमावती जैन कॅन्सर डिटेक्शन सेंटर' सुरू आहे. रोटरी क्लब ऑफ नागपूर मातृ सेवा संघाला नेहमीच सहकार्य करित असते. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. निर्मला वझे, स्त्रीरोग तज्ञ, संकल्प हॉस्पीटल यांनी 'झहिदा बेन कमाल' ओरेशन प्रस्तुत केले. त्यांनी प्रशिक्षणार्थी परिचारीकांना 'Prevention of Cancer – Cervix & Breast' या विषयावर उपयुक्त माहिती दिली.

रोटरी क्लब ऑफ नागपूर, ईशान्य यांनी मातृ-सेवा-संघ, सीताबर्डी येथे २००७ साली 'श्रीमती प्रेमावती जैन कॅन्सर डिटेक्शन सेंटर' सुरू केले. डॉ. मेहेरबानो कमाल या केंद्राच्या प्रकल्प प्रमुख आहेत तसेच त्या शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील माजी प्राध्यापिका व पॅथॉलॉजी विभाग प्रमुख आहेत. त्यांनी गर्भाशयाच्या कॅन्सरला प्रतिबंध करण्यासाठी पॅप-स्मिअर चाचणी, HIV चाचणी व लसीकरण करण्याबाबतची उपयुक्तता व माहिती सांगितली.

भारतात गर्भाशयाच्या कॅन्सरचे प्रमाण जागतिक तुलनेत २७ टक्के आहे. रुग्णाला कॅन्सरच्या तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात निदान होणे हि बाब चिंताजनक आहे. आनंदाची बाब म्हणजे लवकर निदान आणि योग्य उपचाराने गर्भाशयाचा

कॅन्सर पूर्णपणे बरा होऊ शकतो. रोटरीच्या सचिव डॉ. मनीषा राठी यांनी आभार प्रदर्शन केले. रोटरीचे अध्यक्ष, श्री. नरेश बल्दवा, मातृ सेवा संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख, सीताबर्डी सूतिकागृहाच्या वैद्यकीय अधीक्षिका डॉ. पुष्पा भावे, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत, सूतिकागृहातील सर्व डॉक्टर्स कार्यक्रमाला उपस्थित होते.

---

## मातृसेवासंघ, शाखा आर्वी 'कॅन्सर जनजागृती कार्यक्रम'

मातृ सेवा संघ, शाखा आर्वीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांमधे कॅन्सर विषयी जागृती करण्यासाठी शिबीराचे आयोजन केले होते. या शिबीरासाठी 'तारा फाउंडेशन फॉर वूमन'च्या संस्थापिका संस्थापिका, अध्यक्ष डॉ. वंदना बागडी व त्यांच्या सहकारी डॉ. विनीता जयवार, डॉ. सुरेखा नाथानी, डॉ. सुनीता निवाने आलेल्या होत्या. त्यांनी ब्रेस्ट कॅन्सर व सर्व्हीक्स कॅन्सर पर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे महिलांना सखोल मार्गदर्शन केले. स्त्रियांची तपासणी करण्यात आली Breast self examination च्या सोप्या seven steps सांगितल्या व डेमो सुद्धा दिले. १५० महिलांनी याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे संचालन संस्थेच्या सदस्य सौ. कविता जोशी, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेच्या अध्यक्षा अॅड. सौ. अरुणा देशपांडे, तर सचिव सौ. ज्योती भट यांनी आभार प्रदर्शन केले. सहसचिव सौ. शिवानी देशपांडे यांनी गायलेल्या 'वंदे मातरम्'ने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## दु:खद निधन – सीए. अनिल एस्. दाणी

प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट अनिल एस्. दाणी ह्यांचे अल्पशा आजारानंतर शुक्रवार दि. १०-३-२०२३ ला निधन झाले. त्यांचा मातृसेवासंघाशी निकटचा संबंध होता. त्यांच्या मातोश्री प्रमिलाताई दाणी मातृसेवा मासिकाच्या आद्य संपादिका आणि मातृसेवासंघाच्या अध्यक्षाही होत्या. दाणी परिवाराच्या दु:खात मातृसेवासंघ परिवार, मातृसेवा मासिक आणि माजी संपादिका सुनंदा मोहनी परिवार दु:ख आणि दिलगिरी व्यक्त करीत सहभागी आहे.

---

## दु:खद निधन – डॉ. माधवी श्रीकान्त चोरघडे

मातृसेवासंघाचे अत्यंत जवळचे आणि खूप वर्षे मदत करणारे डॉ. श्रीकान्त चोरघडे ह्यांच्या पत्नी डॉ. माधवी श्रीकान्त चोरघडे ह्यांचे दीर्घ आजाराने दि. ११/३/२३ रोजी दु:खद निधन झाले. मातृसेवासंघ परिवार चोरघडे परिवाराच्या दु:खात सहभागी आहे.

---

# फार्म ४
**(नियम ८ पहा)**

| | |
|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थान व पत्ता | : **मातृसेवा संघ,** सीताबर्डी, नागपूर-१२ |
| २. प्रकाशन-अवधी | : मासिक |
| ३. मुद्रकाचे नाव व पत्ता | : श्री एन्टरप्राईजेस, सीताबर्डी, नागपूर |
| आपण भारतीय नागरिक आहात काय? | : होय |
| विदेशी असल्यास मूळ देशाचे नाव | ---- |
| ४. प्रकाशकाचे नाव व पत्ता | : **डॉ. लता देशमुख,** मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर-१० |
| ५. संपादकाचे नाव व पत्ता | : **शीला राव,** तळमजला, ३/ |
| अमेय अपार्टमेंट, धरमपेठ, नागपूर-१० | |
| आपण भारतीय नागरिक आहात काय? | : होय |
| विदेशी असल्यास मूळ देशाचे नाव | ---- |
| ६. नियतकालिकाचे मालक | : **मातृसेवा संघ,** सीताबर्डी, नागपूर - १० |

संपूर्ण भागभांडवलापैकी एक टक्क्याहून (जास्त भागभांडवलाचे हिस्सेदार). मी, डॉ. लता देशमुख याद्वारे असे घोषित करते की माझ्या अधिकतम माहिती आणि विश्वासानुसार वर दिलेले विवरण सत्य आहे.

नागपूर

**डॉ. लता देशमुख**
स्वाक्षरी

---




Regd. with the Registrar of Newspapers, New Delhi 11638/1966

**मातृसेवा** मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर

प्रमुख कार्यालय : उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी, नागपूर – १०
दूरध्वनी ०७१२–२५२२२८७, ०७१२–२५२२३९३ / २५२३५९६

**कार्यक्षेत्र**

**– शाखा –**

१. सीताबर्डी, नागपूर २. महाल, नागपूर ३. वर्धा ४. भंडारा ५. आर्वी ६. जबलपूर ७. हिंगणघाट ८. ब्रह्मपुरी ९. बिलासपूर १०. वरोरा ११. चांदूररेल्वे १२. अकोला

**– सीताबर्डी सूतिकागृहांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सुविधा –**

बाह्यरुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग, बालरोग विभाग, अपूर्णकाल अर्भक विभाग, बृद्ध व स्त्रीरुग्णसेवा, कुटुंब कल्याण योजना, प्रसवपूर्व तपासणी, प्रसवोत्तर तपासणी, बालविकास चिकित्सा केन्द्र, पॅथॉलॉजी, सोनोग्राफी व कलर डॉपलर, पॅपस्मिअर टेस्ट (कॅन्सर निदान केन्द्र), कॉल्पोस्कोपी, एड्स, (आय.सी.टी.सी.टी.) प्रकल्प, मेमोग्राफी, संध्यादीप

**शैक्षणिक कार्यक्रम**

बहुउद्देशीय परिचारिका प्रशिक्षण केंद्र, सी.जी.ओ., डी.जी.ओ. –

**नागपुरातील प्रकल्प / प्रवृत्ती –**

* महिला व बाल कल्याण सीताबर्डी रुग्णालय आणि अनुसंधान संस्था, सीताबर्डी नागपूर ❊ सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र ❊ कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर ❊ इन्स्टिटयूट ऑफ सोशलवर्क, बजाजनगर ❊ नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा व संरक्षित कर्मशाळा, सीताबर्डी, नागपूर ❊ पंचवटी आश्रम ❊ मातृसेवा मासिक ❊ फाउंडलिंग होम, मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल ❊ मातृसेवा संघ सन्मित्र उपहारगृह ❊ कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर ❊ 'स्नेहांगण' अपंग मुलांची शाळा ❊ कौटुंबिक सेवा सल्ला केंद्र, बजाजनगर व मासेस समाजकार्य संस्था बजाजनगर ❊ विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प ❊ कुसुम विहार ❊ मेमोग्राफी सेंटर

Regd. with the Registrar of Newspapers, New Delhi 11638/1966

**प्रकाशक :** अध्यक्ष/सचिव, मातृसेवा संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – १०
**अक्षर जुळवणी व मुद्रक :** श्री एन्टरप्राईझेस, सीताबर्डी, नागपूर – ४४००१२